International Referred Research Journal, July, 2011. ISSN- 0974-2832 RNI-RAJBIL 2009/29954.VoL.III *ISSUE-30

शोध पत्र

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री- पूरूष समानता

June, 2011

* प्राचार्य डॉ. अविनाश चौखंडे ** प्रा. रवि सोपान डाखोरे

* -** श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय दर्यापूर

iLrkouk :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अवघे जीवनच म्हणजे सामाजिक, आर्थीक, व राजकिय समानतेच्या तसेच मानवी मुल्य व मानवी हक्क यांच्या प्रस्तापणेसाठी केलेली अखंड क्रांतीकारक झुंज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झंझावती व क्रांतीकारक चळवळ म्हणून स्वतंत्र, समता, बंधुता व न्याय या बाबतची भुमीका होय. डॉ. बाबासाहेब अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे जातीय विषमतेच्या अपमानाचे दुःख त्यांनी सोसले होते. तसेच तेच दुःख येथील स्त्रियांच्यादेखील वाट्याला आलेले आहे. त्यामुळे आदीवासी , अनुसुचीत जाती, भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीय हे सर्व त्या अपमानाचे बळी आहेत. हे जसे त्यांनी जानले तसेच उच्च वर्णिय स्त्रियांपासुन तळागळातील स्त्रियापर्यंत सर्व स्त्रिया या व्यवस्थेमुळे शोषीत व पिडीत आहेत. हे त्यांनी जानले आणि या सर्वांच्या मुक्तीचा, सुटकेचा उपाय म्हणून कायदा होय. हे त्याच्या दुरदर्शी बुद्धीला पटले. कारण ज्या मार्गांनी ही विषमता व परावलंबीत्व आले. त्याच मार्गाने त्या विषमतेचे परीमार्जन केले पाहिजे असे ठाम पणे त्यांनी स्त्रियांच्या उत्थनासाठी उद्रासाठी कायद्यीच गरज आहे. हे जानले तसेच पुर्वी पासून स्त्रि समस्याचे आकलन स्त्री संख्येचे गणन त्यांनी विचारात घेतले.

दिनांक 27 डिसेंबर 1927 च्या " महाडच्या सत्याग्रहाच्या वेळेस कोणत्याही पदावर नसतांना देखील जवळजवळ पाच हजार स्त्रियांची सभा त्यांनी घेतली स्वाभीमान जागविण्यासाठी व प्रबोधनाची भुमीका त्यांनी एकाच वेळेला घेतलेली दिसून येते. स्त्री आणि पुरूष यांनी मिळून समाजाच्या संसाराच्या अडचणी सोडविल्या पाहीजे पुरूषांनीच हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना फार अवधी लागेल. जर तेच काम स्त्रियांनी अंगावर घेतले तर त्यांना त्याकामात लवकर यश प्राप्त होईल असे माझे मत आहे. यांच सभेत बाबासाहेबांनी दलीत स्त्रियांच्या राहानीमानाबद्दल प्रबोधन केले मुलामुलींना शिक्षण देण्यास सांगीतले विशेषतः मुलींच्या शिक्षणावर भर दिला या प्रबोधनाचा तात्काळ परीणाम दिसून आला. सभेवरून परततांना स्त्रियांच्या वस्त्र नेसण्याच्या पद्धतीत बदल झालेला होता. ब्रिटीशांच्या राजवटीत दलीत पुरुषां बरोबर स्त्रियांनी देखेल क्रातीकारक होण्याचे प्रशिक्षण बाबासाहेबांनी दिले. कारण त्यांची प्रामाणीक धारणा होती की, स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून असते.

दिनांक 20 जुलै 1942 साली नागपूरला दलित स्त्रियांची परीषद (सभा) आयोजीत करण्यात आली होती. त्या सभेत 20 – 25 हजार स्त्रियांची उपस्थिती पाहून स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली. असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मोजत असतो. याच भाषणात त्यांनी लग्नाच्या मुलीसासाठी दिलेल्या उपदेश दिसतो. लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतिची मैत्रीण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामाप्रमाणे वागवल्यास तीने खंबीरपणे नकार द्यावा व समानतेसाठी आग्रह धरावा.

संविधानात कलम 161 व 2 नुसार सेवायोजन पदनियुक्ती, नौकरी इ. धर्म जात. वंश, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास इतयादीवरून भेदभाव केला जानार नाही व सर्व नागरीकास समान संधी मिळेल. या कलमांचा स्त्री जीवनावर काय परिणाम होईल हे पाहणे जरुरीचे आहे. लिंग भेदामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहे. कारण परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे पण आज स्त्रि मुक्ती संघटना ह्या अत्याचारा विरूध्द लढत आहेत विशेषतः स्त्रियांनी ही बाजु कणखरपणे सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्री मुक्ती बरोबर स्त्री वादाचा आग्रह स्त्री संघटनांनी धरलेला दिसतो. त्यामुळे स्त्री हक्काची भुमीका अर्थातच आग्रही ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानामुळे हे स्त्रियांना मिळाले हिन्दू कोड बिलांचा या दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. 12 ऑगष्ट 1948 रोजी आंबेडकरांनी हिन्दू संहिता विषयक मध्यवर्ती विधीमंडळात चर्चेसाठी आणले त्यासाठी केलेल्या भाषणात म्हणाले या विधेयकाने हिन्दू संहितीकरण व त्यात आवश्यक त्या सुधारणा करणे असा हेतू होता. हिन्दू कायद्याने ज्या सात अंगाचा विचार विधेयकात केला ती सात अंगे पुढील प्रमाणे मिळकतीचा वारसा, वारशाची परंपरा, परजीवी का, विवाह, घटस्फोट, दत्तक, व अल्पवयीन पालकत्व स्त्रियांची कुटूंबातील स्थिती व समाजात मिळणारी प्रतीष्ठा याची जाणीव करून अपमानजनक परिस्थितीतून बाहे काढून सन्मानाने स्थान प्रतीष्ठा मिळवून द्यावी यासाठी हिन्दू सहिता विधेयक म्हणजे हिन्दू कोड बिलाचे काम हाती घेतले.

10 ऑगस्ट 1951 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद मुक्कामातुन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांना पत्र लिहून कळवीले की, माझे प्रकृतीची मला आणि माझे डॉक्टरांना चिंता वाटत आहे. तथापी डॉक्टरांच्या स्वाधीन होण्यापुर्वी हिन्दू सहीता विधियेक हाता वेगळे करण्याची मला उत्कंठा लागुन राहली आहे. 17 सप्टेंबर 1951 रोजी लोकसभेने हिन्दू सहिता विधेयकाचा विचार करण्यास सुरवात केली. विधेयकाला प्रचंड

विरोध झाला. अखेर ते मागे घेतल्या गेले चार कलम सम्मत झाल्यावर ते विधेयक ठार मारुन पुरण्यात आले. त्यापैकी कोणीही रडले नाही कोणीही त्याचा शोक केला नाही. डॉ. आंबेडकरांनी या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

डॉ. बाबासाहेबांना हिन्दू कोड बिलाबद्दल किती आस्था होती हे त्यांच्याच शब्दात आपल्याला कळते ते म्हणतात. ''मला वाटते हिन्दू संहितेसाठी आपण आपल्या विधीमंत्री पदावर रहावे हिन्दू सामाजिक सुधारणेचे ते मोठे पाउल होय जे भारतीय कायदेमंडळाने पहिल्यांदा उचलले '' न भूतो न भविष्यती '' अशा प्रकारचे ते बिल म्हणून महत्वाचे आहे. वर्गातील असमानता व स्त्री पुरूषातील असमानता जी हिन्दू समाजातचा प्राण आहे. तीला स्पर्श न करता सोडून देणे व आर्थिक समस्यासाठी कायदे पारित करणे म्हणजे आमच्या राज्य घटनेचे हास्यास्पंद विडंबन होय शेनाच्या ढिगा–यावर महाल बांधने होय'' या महत्वाच्या कारणासाठीच मला हिन्दू कोड बिला विषयी जिव्हाळा वाटतो या बीलाबद्दल त्यांना अतिशय मनस्ताप सहन करा लागला. त्यांनी स्पष्ट म्हटले In Regard to this bill I have been made to go through the greatest mental tortre. या बिलाचे पारित न होणे म्हणेजे विरोधका समोर नांगी टाकने हे दुःख त्यांना होते त्यामुळे नाईलाज होवून त्यांना दिनांक 10 ऑक्टोंबर 1951 ला मंत्री पदाचा राजीनाम्याची घोषणा करावी लागली.

आपण स्त्रियांसाठी जे ठोस केले ते होत नाही. असे दिसल्यांवर त्यांना नैराश्य आले. कारण लोकसंख्येच्या अर्धा भागाचा प्रश्न असा वा–यावर गेला होता. परंतु पुढे राजीनाम्याची धमकी दिल्या नंतर पं.नेहरूंनी हे बील खंडाखंडाने पारित केले स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने बाबासाहेबांनी हे अलौकीक कार्य केले. या कार्यालयासाठी भारतीय स्त्रि वर्ग त्यांच्या आजन्म ऋणी राहील हे ऋण शब्दाद्वारे बोलके करतांना बॅ.सुनीता पुगलया म्हणतात, '' डॉ. आंबेडकरांनी हिन्दू कोडबिलाचा आग्रहच धरला दलीत मसजाचा नेता हिन्दू स्त्रियांच्या हक्कासाठी निर्धाराने उभा राहीला.

भारतीय स्वातंत्राचा इतिहास लिहीला जाईल तेव्हा राजराम मोहनराय, आगरकर, महात्मा फुले यांच्या बरोबर बाबासाहेबांचे नाव सुवर्णाक्षराने लिहील्या जाईल. अषा प्रकारे स्त्री–पुरूस समानते बाबात बाबासाहेबांचे विचार होते.

## संदर्भ ग्रंथ

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण खंड 18 भाग 1 पृ. 143 2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण खंड 18 भाग 1 पृ. 426 3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशक प्रकाश विश्वासराव लोकवाङःमय गृह 85 सपानी रोड प्रभादेवी मुंबई दुसरी आवृत्ती 2008 पृ.64 4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशक प्रकाश विश्वासराव लोकवाङःमय गृह 85 सपानी रोड प्रभादेवी मुंबई दुसरी आवृत्ती 2008 पृ.64